प्रकरण ७

Chapter-7

# उपसंहार

प्रकरण ७ :

# उपसंहार

# प्रकरण ७ : उपसंहार

प्रस्तुत प्रकरणात आत्तापर्यंतच्या आपल्या संशोधनस्वरूप अभ्यासाचे काही लक्षणीय निष्कर्ष एकत्रित स्वरूपात मांडले आहेत. राजन गवस यांच्या लेखनाचा अभ्यास करण्यामागची भूमिका या प्रबंधात सुरूवातीसच नमूद केली आहे. १९८० नंतरच्या काळातील लेखकांमध्ये राजन गवस यांचे नांव महत्त्वाचे आहे. त्यांनी कथा, कविता आणि कादंबरी या विविध वाङ्मय प्रकारात त्यांनी लेखन केले असले तरी त्यांनी लिहिलेल्या कादंब–यांची संख्या आणि गुणवत्ता पाहता मराठी साहित्यात 'कादंबरीकार' या दृष्टीने त्यांचे योगदान अधिक मौलिक आहे. गवस यांच्या इतर लेखनाचा (मुलाखती, समीक्षात्मक व वैचारिक लेखन) प्रस्तुत प्रबंधामध्ये समावेश करण्यात आलेला नाही.

प्रस्तुत प्रबंधात त्यांच्या निर्मितीशील लेखनाच्या अभ्यासाची चौकट आखून घेण्यात आलेली आहे. प्रबंधातील पहिल्या प्रकरणात **'मराठी कादंबरीच्या पार्श्वभूमीचा थोडक्यात'** विचार केलेला असून गवस यांच्या लेखनातील प्रेरणेमागे मराठी साहित्यातील साठोत्तरी काळात निर्माण झालेले विविध प्रवाह आणि वाङ्मयीन चळवळी यांचे पर्यावरण कसे कारणीभूत ठरले आहे हे संक्षिप्त स्वरूपात सांगितले आहे. त्यातही विशेषत: कादंबरी हा वाङ्मय प्रकार वास्तव दर्शनासाठी अधिक महत्त्वाचा असून त्यामधून व्यक्ती व समाज यातील परस्परसंबंध व्यक्त होत असल्यामुळे गवस यांच्या साहित्याची पूर्वपीठिका पाहताना कादंबरीच्या पार्श्वभूमीचा विचार केलेला आहे.

१९६० नंतर मराठी कादंबरीत आलेल्या वास्तववादी प्रवाहाने मराठी कादंबरीतील विविधता आली. विशेषत: दलित आणि ग्रामीण कादंब–या लिहिल्या जाऊ लागल्या. त्याचा विचारही केलेला आहे. याच परंपरेत राजन गवस यांच्या कादंब–या येतात.

**'राजन गवस यांच्या कादंब-यांचे स्वरूप'** हे या प्रबंधातील दुसरे प्रकरण आहे. राजन गवस यांच्या कादंब-यांचा विचार कथानक, पात्रे, नायक, निवेदक या दृष्टिकोनामधून केलेला आहे. मराठी कादंबरीच्या परंपरेतील रंजनप्राधान्यता, स्थलकाल निरपेक्ष चिरंतन मूल्ये यांच्यापेक्षा गवस यांच्या कादंब-यांचे कथानक स्थलकाल, प्राधान्यातून निर्माण होते. 'चौंडकं', 'भंडारभोग', 'धिंगाणा', 'कळप' आणि 'तणकट' या कादंब-यातील कथानक हे जातीधर्मानुसार निर्माण झालेली शोषण व्यवस्था, स्वातंत्र्योत्तर काळातील समाजकारणाचे झालेले राजकीयकरण त्यातील गुंतागुंत, शोषणाच्या विविध उतरंडी यांना अग्रक्रम देणारे आहे. समाजरचनेतील निरनिराळ्या स्तरावरील माणसे आणि त्यातील शोषित व्यवस्थांच्यामुळे सर्वसामान्य माणसाला भोगावी लागणारी दु:खे हा राजन गवस यांच्या कथा, कादंब-यातून आस्थेचा प्रश्न आहे. त्यांच्या कादंब-यातील आशयसूत्रे या आस्थाकेंद्रातून निर्माण झालेली असून वास्तवदर्शन ही त्यामागील प्रमुखभूमिका आहे. कादंबरीच्या कथानकात त्यामुळेच एक खुला अवकाश निर्माण होतो व तो रूढ, पारंपरिक कथानकाच्या बंदिस्ततेत अडकून राहात नाही. त्यांच्या कादंब-यातून स्त्रियांचे प्रश्न आणि दु:ख ही समूहचित्रणाचे भाग स्वरूपात येतात. त्यांच्या कथांमधून ग्रामीण, अर्धनागर आणि नागर भागातील स्त्रियांचे विविध प्रश्न आणि त्यामधून त्यांच्या वाटयाला आलेले दु:ख प्राधान्याने येते. या दृष्टिने कथा आणि कादंब-यातील सूत्र एकाच स्वरूपाचे दिसते. गवस यांच्या कादंब-यातील पात्रांचे वर्तुळ त्यातील विविध स्तर या सर्वांची वर्गवार विभागणी करून विचार केलेला आहे. गवस यांच्या कादंब-यातील नायक हे समूहातीलच एक व्यक्ती म्हणून आपल्यासमोर अवतरतात. पारंपरिक नायक कल्पना आणि गवस यांच्या कादंब-यातील नायक कल्पना यांच्या बदलत्या रूपाचा विचारही येथे केलेला आहे. हे नायक आपल्याच भू-परिसरातील माणसांच्या जगण्याच्या परंपरेतील आहेत. समाजभिमुख असे हे नायक समाजातील किडलेपण दाखवत जातात. अशावेळी या नायकांची कृती म्हणजे या किडलेल्या समाजप्रवाहात सामील न होणे, ही असते.

गवस यांच्या कादंब-यांतील नायक हे समकालीन तरूणांच्या जीवनातील

संवेदनशीलतेचा प्रवास अधोरेखित करतात. समाज आणि व्यक्तीच्या नात्याच्या सूक्ष्म संशोध घेताना त्यांनी प्रथमपुरूषी आणि तृतीयपुरूषी निवेदनाचा वापर केलेला आहे. असा वापर करताना कादंबरीतील आशयाच्या गरजेचा विचार अधिक महत्त्वाचा ठरतो. ' धिंगाणा' आणि 'कळप' मध्ये प्रथमपुरूषी निवेदन आहे. या कादंब-यातील नायक हा स्वत:च निवेदक आहे. या नायकांच्या सभोवतालच्या समाजजीवनात अनेक पातळ्यावर चालणा-या भ्रष्टाचारावर दुटप्पीपणावर, ढोंगीपणावर त्यांच्या प्रतिक्रिया या तीव्र आणि उपरोधिक स्वरूपाच्या आहेत. त्यामुळे त्यात प्रथमपुरूषी निवेदन लेखकाला अधिक उपयुक्त ठरते. या प्रथमपुरूषी निवेदनातही ते अतिशय सहजपणाने तृतीयपुरूषी निवेदनाच्या पातळीवर सहजपणाने येतात व त्यामधून प्रथमपुरूषी आणि तृतीयपुरूषी या पातळ्यांची सहजपणाने सरमिसळ होत त्याला अधिक लवचिकता दिली जाते व प्रथमपुरूषी निवेदनातूनच कादंबरीकाराला नायकाच्या सभोवतालचा अवकाश आपल्या निवेदनात सामावून घेणे शक्य होते. 'चौंडकं', 'भंडारभोग' आणि 'तणकट' यामध्ये तृतीयपुरूषी निवेदन आहे. तृतीयपुरूषी निवेदनामधून वास्तवाकडे अधिक व्यापकपणे पाहता येणे शक्य होते. देवदासींचे जगणे आणि त्यांच्या जगण्याचे विविध पातळ्यावरील वास्तव तृतीयपुरूषी निवेदनाचा अधिक उपयोग झाला आहे. तृतीयपुरूषी निवेदनातही गवस अत्यंत लवचिकता आणतात. तृतीयपुरूषी निवेदन धूसर करीत ते प्रथमपुरूषी निवेदनावर सहजपणाने झुकतात. त्यामुळेच सुलीच्या दु:खाची उत्कटता, बायजाच्या मनाची पीडा हे तृतीयपुरूषी निवेदनालाच जणूकाही प्रथमपुरूषी निवेदनाचे रूप देत प्रकट होणे अधिक प्रत्ययकारी ठरते. 'भंडारभोग' आणि 'तणकट' या दोन्ही कादंब-यातही तृतीयपुरूषी निवेदन गवस यांनी कौशल्याने वापरले आहे. तृतीयपुरूषी निवेदनात कथा, कादंब-यातील स्थलकाल संदर्भातील असंख्य तपशील प्रकट होण्यास अवसर मिळतो. 'भंडारभोग' काय 'तणकट' काय या दोन्ही कादंब-यात घटना प्रसंगाचे सर्व बारीकसारीक तपशील अनेकवेळेला येतात. पण या तपशिलात फापटपसारा असत नाही. 'भंडारभोग' मधील रांडा पुनवाच्या प्रसंगातील अनेक तपशील हे आशयद्रव्याची अन्वर्थकता वाढवत असतात. अशात-हेच्या निवेदनातून

वास्तवाचे भरीवपण आणि प्रखरता आपल्यासमोर येते. 'तणकट' सारख्या कादंबरीतही तृतीयपुरूषी निवेदक हा कादंबरीतील जीवनानुभूतीचा साक्षी असतो. परंतु त्याचे अस्तित्व लोप पावल्यासारखे दिसते. वाचकाच्या समोर व्यक्ती, घटना, प्रसंग येत राहतात आणि त्यामुळे कादंबरीतील वास्तवता अधिक कसदार होते. गवस यांच्या तृतीयपुरूषी निवेदनातून एकाचवेळी त्यापेक्षा अधिक जीवनस्तरांचे दर्शन ही घडविले जाते. 'भंडारभोग' मधील तायाप्पाचे जगणे, त्याची मन:स्थिती, त्याच्या सभोवतालच्या जोगत्यांचे जगण्याविषयीचे वेगळे विचार आणि परिवर्तनवादी चळवळीतील दुटप्पीपणा यासारख्या भिन्न स्वरूपाची मानसिकता असणा-या माणसांचे जीवन दर्शन घडविले जाते. तृतीयपुरूषी निवेदनामुळे गवस यांना शक्य झाले आहे.

**'राजन गवस यांच्या कादंब-यातील समाजचित्रण'** हे प्रकरण तिस-या क्रमांकाचे आहे. या प्रकरणात गवस यांच्या कादंब-यातून प्रकट होणारे भूसांस्कृतिक विशेष कुटुंब व्यवस्था, तरूण वर्गाची स्थिती, जातीयवादाचे चित्रण इ. चा विचार केलेला आहे.
गवस यांच्या कादंब-यातील सामाजिक चित्रणाचा आवाका मोठा आहे. त्यात ग्रामीण, अर्धनागर आणि काही प्रमाणात नागर जीवनाचे वास्तव प्रकट झालेले आहे. ते प्रकट होते स्थलकालाच्या विशिष्ट अशा वास्तव परिमाणातूनच. महाराष्ट्र – कर्नाटकाच्या सीमा भागातील जीवनाच्या या चित्रणाला परिसर प्राधान्यतेमुळे, लेखकाच्या विशिष्ट नैतिक भूमिकेमुळे नेमाडेंनी प्रवर्तीत केलेल्या देशीवादाचे प्रभावी रूप प्राप्त झाले आहे. अर्थातच नेमाडे यांचे हे अंधानुकरण नसून हा प्रभाव पचवून लेखकाने आपली स्वतंत्र ओळख यातून पटवून दिली आहे. ग्रामीण जीवन आणि शहरीकरण यांच्यातील ताणतणाव आणि दोन भिन्न आर्थिक ढाच्यातील दोन मूल्य प्रणालीतील विसंवाद त्यांच्या 'कळप' आणि 'तणकट' मधील समाजचित्रणातून प्राधान्याने येतो. स्वातंत्र्योत्तर काळातील घटनेने दिलेली समानता आणि सत्तास्थानासाठी जाती जातींची गटबाजी त्यातून वाढणारी तेढ, संघर्ष, स्वार्थीपणा याने किडलेल्या पीडलेल्या समाजाचा उभा आणि आडवा छेद गवस आपल्यासमोर जणूकाही शल्यक्रिया करून समोर ठेवतात. समाजातल्या प्रत्येक सामान्य

मनुष्याला एक न्यायी मानवतेची वागणूक मिळावी, ही उदात्त अपेक्षा त्यातून सतत ध्वनित होत राहते. या प्रकरणात या सर्वांविषयी वेगवेगळ्या अंगाने चर्चा केलेली आहे.

प्रकरण चौथ्यामध्ये **'राजन गवस यांच्या कादंब-यातून प्रगट झालेला दृष्टिकोन'** या विषयी चर्चा केलेली आहे. राजन गवस आपल्या कादंब-यातून समाजातील अंत:स्तराचा वेध घेत त्यामधल्या अनेक पातळ्यावरील किडलेपण मूल्य-हास आणि भ्रष्टता यांचा वेध घेतात. त्यांचे नायक या मूल्य-हासात्मक सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय पर्यावरणावर आपल्या तीव्र प्रतिक्रिया व्यक्त करतात. असे करताना आपली नैतिकता न सोडण्याची त्यांची कृतिशीलता आपल्यासमोर प्रकट होते. महागावकरांच्या जिव्हाळ्याचा रघू चिलमीला कोणताही फायदा घ्यावयाचा नसतो. आणि सुरेशसारखा आपला मित्र तथाकथित बाजारू मूल्यांचा स्वीकार करतो. ते पाहून सुरेश व्यथितही होतो. लेखकाच्या जीवनदृष्टीवर म. फुले, गांधी, आंबेडकर, शाहु महाराज यांचे संस्कार जाणवत राहतात. लेखकाच्या विशिष्ट अशा जीवनदृष्टीचा प्रत्यय कादंबरीतून कसा येतो. त्याची चर्चा प्रस्तुत प्रकरणात केली आहे.

गवस यांनी आपल्या कादंब-यातून अनेक स्त्रियांची चित्रणे केलेली आहेत. 'चौंडकं' चा अपवाद सोडता गवस यांच्या कादंबरीत नायिका नाही. स्त्रियांच्या देहाची अनावश्यक वर्णने, त्यांच्या वस्त्रप्रावरणांची, हालचालींची, विभ्रमांची आकर्षक रूपे त्यांच्या कादंबरीत येत नाहीत. स्त्रीच्या रंजनपर वस्तूरूपाला नकार देत तिला अधिक मानवी रूपात ते सहृदय जाणिवेने पाहतात. पारंपरिक रंजनवादाची चौकट न स्वीकारता सामाजिक आशयद्रव्यातून कादंबरीलेखन करणा-या या लेखकाने आपल्या कादंबरीतून रघूचिलमी, कबीर यांच्या ऐवजी एखाद्या स्त्रीपात्राचे चित्रण केलेले नाही. समूहचित्रणाचा, समाजचित्रणाचा एक भाग या स्वरूपात त्यातील स्त्रियांची चित्रणे येतात. त्यात समाजजीवनातील अनेक क्षेत्रातील स्त्रिया त्यांचे विविध प्रश्न आणि त्यातून निर्माण झालेले दु:ख कादंबरीतून प्रकट होते. मानवी सहृदयतेने समाजातील एक शोषित भाग म्हणून लेखक त्याकडे पाहताना दिसतो.

गवस यांनी आपल्या कादंबरीतून तत्कालीन महाराष्ट्रातील शैक्षणिक क्षेत्रातील निरनिराळ्या वृत्तिप्रवृत्तींचा विचार केलेला आहे. त्यातून शैक्षणिक क्षेत्रातील भ्रष्टाचार गांधी, आंबेडकरांच्या विचारांचा समाजाला पडलेला विसर, जातीयवादाचे शिक्षण क्षेत्रामध्ये भिनलेले विष असा अनेक पातळ्यांवरील नैतिक मूल्यांचा -हास त्यांच्या कादंब-यातील शिक्षण क्षेत्रातील चित्रणामधून दिसून येतो. समाजजीवनातील अनेक अनिष्ट प्रवृत्तींचे दर्शन त्यांनी शिक्षण क्षेत्राच्या या भिंगातून दाखविले आहे. गवस यांच्या कादंब-यातील शैक्षणिक दृष्टिकोनांमध्ये तत्कालीन काळातील महाराष्ट्रातील शैक्षणिक क्षेत्रातील वृत्तीप्रवृत्तींचा विचार आलेला आहे. शैक्षणिक क्षेत्रात शिरलेली भ्रष्टता, नैतिक मूल्यांचा -हास इ. बाबींचा विचार प्रकट झालेला आहे.

**'राजन गवस यांच्या कादंब-यातील रचनातत्त्वे'** या पाचव्या प्रकरणात गवस यांच्या कादंब-यातील काही महत्त्वाच्या रचनातत्त्वांच्या घटकांचा विचार केलेला आहे. १९६० नंतरच्या मराठी कादंबरीत अनेक बदल घडून आले. त्यात कादंबरीच्या विविध रचनातत्त्वांमध्ये ही बदल घडून आले. ही विविध रचनातत्त्वे म्हणजे कथानक, पात्र, भाषा, संवाद, दु:ख, संकल्पना, निवेदनशैली, वास्तवद्रव्य, नैतिकता, देश्य संकल्पना इ. आहेत. त्यातील काही घटकांचा विचार मागील प्रकरणात झालेला आहे. येथे वास्तवद्रव्य, भाषा, दु:ख संकल्पना या घटकांचा विचार केलेला आहे.

कादंबरी आणि कादंबरीकार हा समाजाचा घटक असतो. समाजजीवन त्यातील व्यक्ती आणि समाजाचे गुंतागुंतीचे परस्पर संबंध हे सामाजिक वास्तव कादंबरीतील आशयद्रव्याचे मूलभूत स्वरूप असते. गवस यांच्या कादंब-यातून ग्रामीण, अर्धनागर आणि नागर संस्कृती, त्यातील परस्पर संक्रमणे सामाजिक वास्तवरूपात प्रकट होते. कादंब-यातील वास्तवाचे चित्रण करताना व्यक्ती आणि ती ज्या समाजात, परिसरात, वातावरणात जगते त्या सर्वांचे वास्तवचित्रण कादंबरीकाराने केलेले आहे. अनेक सर्वसामान्य घटना भरगच्च तपशील, विशिष्ट भूमीचे गुणधर्म, निरनिराळी निरीक्षणे, बोलीभाषा, व्यक्तिभाषा अशा अनेक अंगाने गवस यांच्या कादंबरीतून वास्तवाचे चित्रण

होते. या वास्तवाला देशी परंपरेचे जीवनसन्मुखतेचे आणि नैतिक मूल्यांचे परिमाण लाभलेले आहे.

गवस यांच्या कादंबरीतील भाषा सामाजिक वास्तवाचे एक अंग आहे. भाषा ही सामाजिक संदेशवहनाची मनुष्याने स्वत: निर्माण केलेली व्यवस्था असल्याने भाषेतूनच समाजाचे अनेकस्तरीय रूप व्यक्त होते. सततच वाहत्या असणा-या बोलीभाषेच्या वापरातून तिची अभिव्यक्ती, क्षमता विकसित करून सर्जनाच्या पातळीवर आणावी लागते. भाषेचे सर्वच भेद सहज मानून एका भाषिक समूहातील व्यवसाय, वय, लिंग, शिक्षण, प्रसंग, पेशा, जीवनशैली यानुसार वापरली जाणारी अनेकरूपे भाषेच्या सर्जनशीलतेत मौलिक मानली जातात. तेथे शुद्ध आणि अशुद्ध हा भेद मानणे अयोग्य ठरते. आपल्या अनुभवविश्वानुसार यासारख्या अनेक भाषिक संदर्भांचा वापर कलावंत आपल्या कृतीमध्ये करत असतो.

गवस यांनी आपल्या कादंब-यातून भाषेकडे या संदेशवहनाच्या दृष्टिकोणातून पहात तिचा वापर केलेला आहे. भाषा आणि संस्कृती, भाषा आणि भौगोलिकता, भाषा आणि जाती, भाषा आणि पोटजाती, भाषा आणि मूल्यविचार अशा विविध घटकांचा प्रत्यय आपल्याला त्यांच्या साहित्यातून येत राहतो. त्यासाठी त्यांनी ग्रामीण, अर्धनागर, नागर, व्यवहारभाषा, बोलीभाषा, प्रादेशिक भाषा अशा अनेक भाषिक पातळ्या एकत्र करीत आपल्या कादंबरीतील अनुभवविश्व निर्माण केलेले आहे. हे सर्व विचार प्रस्तुत प्रकरणात अनेक उदा. सह स्पष्ट केलेले आहे.

**'राजन गवस यांच्या काव्यसंग्रहाचा आणि कथासंग्रहाचा विचार'** या सहाव्या प्रकरणामध्ये केलेला आहे. 'हुंदका' या काव्यसंग्रहाचा आणि 'रिवणावायली मुंगी' या कथासंग्रहाचा विचार येथे केलेला आहे. राजन गवस यांच्या 'हुंदका' या काव्यसंग्रहात ग्रामीण जीवनातील स्त्रियांची विविध रूपे, त्यांचे दु:ख हे संवेदनशीलतेने आलेले आहे.

'रिवणावायली मुंगी' या कथासंग्रहात ही आधुनिकीकरणामुळे, शिक्षणाच्या प्रसारामुळे ग्रामीण भागात स्थित्यंतर घडून आले. मध्यमवर्गावर तसेच तळागाळातील

लोकांवर त्याचा परिणाम झाला. लोकांची जीवनशैली बदलली. त्यात या वर्गातील स्त्रियांही जागृत झाल्या आणि शिकू लागल्या. या जागृत झालेल्या स्त्रिया स्वत:वर होणा-या अन्यायाचा विरोध करीत, त्याविषयी विचार व कृती करू लागल्या. या सर्वांचे चित्रण या प्रकरणात केलेले असून गवस यांच्या कथा कादंबरी या साहित्यातही आशयाचे एक सूत्र विविध रूपांतून करत करत प्रकट होते ते दाखविण्याचा प्रयत्न केलेला आहे.

राजन गवस यांच्या साहित्याचे निष्कर्ष –

- १) राजन गवस यांच्या कादंब-यांमध्ये सामान्य माणूस हाच मुख्य व्यक्तिरेखा म्हणून आलेला आहे. सामाजिक वास्तवचित्रण ही त्यांच्या कादंबरी व कथालेखनामागील मुख्य भूमिका आहे.
- २) राजन गवस यांच्या कादंब-यांमध्ये नायक हे आपल्याच भूपरिसरातील, माणसांच्या जगण्याच्या परंपरेतून आलेले आहेत आणि कादंबरीतून त्यांची समाजभिमुख प्रवृत्ती ही दिसून येते.
- ३) समाज आणि व्यक्ती यांच्या परस्पर संबंधातून व्यक्ती वर्गीय, जातीय यांच्या चौकटीत न अडकता त्याला कमीतकमी न्यायाने जगता येणे आवश्यक आहे. तेथे आपल्या समाजात शोषणाच्या अनेक व्यवस्था धर्म, श्रद्धा यांच्या आधाराने निर्माण झालेल्या आहेत. अशावेळी विशिष्ट जात, वर्गाच्या अनेक हितासाठी आपल्या समाजात अनेक व्यक्तींचे शोषण होते. हे राजन गवस यांनी कथा, कादंब-यांमध्ये दाखवून दिले आहे.
- ४) रूढ, पारंपारिक चौकटीपेक्षा व्यक्तीच्या न्यायी जगण्याला माणूसपणाला महत्त्व देणारी समाजिकता त्यांच्या मूल्यविचारात प्रकट झालेली आहे.
- ५) राजन गवस यांच्या कादंब-यात सामान्य माणसे केंद्रस्थानी असून त्यांच्याकडून जपली जाणारी माणुसकीची नैतिकता ही प्रमुख मूल्यस्वरूपात दिसून येते.
- ६) राजन गवस यांनी आपल्या कथा कादंब-यांमधून व्यक्ती आणि समाजाचा

परस्परपूरक आंतरिक संबंधाचा आढावा घेत समाजाच्या अंत:स्तरात जाऊन व्यक्ती व समाजाच्या आंतरिक संबंधाचा शोध घेताना दिसतात.

- ७) राजन गवस यांच्या कथा कादंब-यांमध्ये सामान्य माणूसच केंद्रस्थानी आहे. समाजातील विविध स्तरांवरील विविध स्वभावाची साधीसुधी माणसे आलेली आहेत. यातील काही सामान्य लोकांच्या जगण्यातूनच समाजात काहीतरी मूल्यात्मक कृती दिसून येते. हे ते वारंवार दाखवितात.
- ८) राजन गवस यांनी देशीयतेचे भान जपत चित्रित केलेला परिसर, तेथील मानवसमूह, त्यांची संस्कृती यांना महत्त्व दिलेले आहे.
- ९) राजन गवस यांच्या कथाकादंब-यातून ग्रामीण स्त्रीची विविधरूपे, तिची दु:खे आलेली आहे. त्यांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन पाहता लक्षात येते की ते स्त्रीविषयी, तिच्या कुटुंबातील, समाजातील स्थानाविषयी जागरूक दिसतात.
- १०) राजन गवस यांच्या कादंब-यांमध्ये प्राण्यांचे चित्रण 'माणसांच्या' संदर्भासह आलेले आहे.
- ११) गवस यांच्या कादंब-यातील बहुतांशी कथानक ग्रामीण, अर्धनागर आणि काही प्रमाणात नागर भागात घडताना दिसते. त्यामुळे या परिसरातील ग्रामीण व अर्धनागरी निमशहरी जीवन कादंबरीतून प्रकट झालेले आहे.
- १२) विशिष्ट भौगोलिक परिसर, त्या परिसरातील सांस्कृतिक वैशिष्टये, त्यांचा माणसांच्या जगण्यावर होणारा परिणाम ही गवस यांच्या कादंब-यात दिसून येतो. त्यांच्या कादंब-यांमध्ये ग्रामीण, गावपातळीवरील शहरीकरण ही आलेले आहे. त्यात कादंब-यातील ग्रामीण परिसर, तेथील कृषिसंस्कृती, गावातील सामाजिक, आर्थिक रचना, तेथील कुटुंब व्यवस्था, तेथील माणसांचे परस्परसंबंध, सामूहिकता यांची वास्तवचित्रणे आलेली आहेत.
- १३) कादंब-यांमध्ये आलेला परिसर, तेथील भौगोलिक परिस्थिती, तेथील

कृषिसंस्कृति आधारीत जीवनपद्धती ही आलेली आहे.

- १४) गवस यांच्या कादंब-यांमध्ये येणारा विशिष्ट परिसर हा वर्तमानाशी घडत जाणा-या अशा गतिशील प्रक्रियेत येतो.
- १५) गवस यांच्या कादंब-यांतील परिसरातील धार्मिक, रीतिरिवाज, तेथील सणवार, यात्रा यांचे वर्णन त्यात वास्तवतेच्या अंगाने येते.
- १६) गवस यांच्या कादंब-यांमध्ये तरूणवर्गाच्या समस्या, त्यांचे समाजातील स्थान, समाजाची त्यांच्याकडे पाहण्याची दृष्टी, त्यांची आर्थिक, मानसिक कुचंबणा अशा विविध पातळीवरील प्रश्नांचा विचार आलेला आहे.
- १७) राजन गवस यांनी महाराष्ट्र कर्नाटक सीमेवरील समाजातील जातीच्या व्यवस्थेचा अनेक अंगाने विचार केलेला आहे. स्वातंत्र्योत्तर काळात शैक्षणिक, धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रात 'जात' या घटकाला दिले जाणारे महत्त्व ग्रामीण वास्तवासह आलेले आहे.
- १८) राजन गवस यांच्या कथांमध्ये समाजातील मध्यमवर्गीय, तळागाळातील स्त्रियांनी शोषणाविरूद्ध बंड केलेले आहे. ग्रामीण जीवनावर आधुनिकीकरणाचा प्रभाव कोणकोणत्या स्वरूपात कसा पडला या विषयी त्यांच्या कथा आपल्याला काही प्रश्न सांगू पाहतात.
- १९) गवस यांच्या कथांमध्ये वातावरण हे फक्त पार्श्वभूमीसाठी नसून विशिष्ट कथा हेतूसाठी आलेले आहेत. वातावरणाच्या चित्रणातून प्रत्यक्षतेचा परिणाम साधला आहे. त्यामुळे त्यांच्या कथेत स्थळ, काळ, वातावरण हे महत्त्वाचे घटक झालेले दिसतात.
- २०) 'चौंडकं', 'भंडारभोग' सारख्या कादंब-यातून जोगतिणी, जोगते त्यांच्या श्रद्धा-अंधश्रद्धा, त्यांच्या समजूती, त्यांच्यातील कला, त्यांच्याकडे पाहण्याची समाजाची दृष्टी मांडलेली आहे. समाजाच्या एका उपेक्षित स्तरातील माणसाच्या

भयावह जीवनाविषयी वाचकाला त्या विचार करायला लावतात.

- २१) 'चौंडकं' आणि 'भंडारभोग' मध्ये देवदासी व जोगते यांच्या व्यथा, वेदना, भाव, भावनां बरोबर मानसिक कुचंबणा, कोंडी, सांस्कृतिक रूपांतरण या सर्वातील व्यामिश्रतेचे ताण त्यांच्या या कादंब-यातून आलेले आहे.
- २२) 'चौंडकं' ते 'तणकट' या कादंब-यातून ग्रामीण स्त्रीची विविधरूपे त्यातही स्त्री जीवनाला व्यापून टाकणारे दु:ख ही अत्यंत संवेदनशीलतेने आलेले आहे.
- २३) 'धिंगाणा', 'कळप' आणि 'तणकट' या कादंब-यांमध्ये साठोत्तरी काळातील तरूणांच्या धारणा, त्यांची संवेदनशीलता प्रश्न व समस्या सामाजिक पर्यावरणासह येतात. 'कळप' मध्ये दलित, ग्रामीण साहित्यात आलेला वरपांगीपणा, सामाजिक, साहित्यिक चळवळीतील फोलपणा, शोषण प्रक्रिया नायकानी दाखविली आहे तर 'तणकट' मध्ये दलित ग्रामीण चळवळी, त्यातील राजकारण, सत्तास्पर्धा, शोषण प्रक्रिया, त्याला असलेले कारणे यांचे चित्रण मूल्यमानासह प्रकट होते.
- २४) राजन गवस यांच्या कादंब-यातील रघू, कबीर, मोहन बल्लाळ, शंकर, दिलावर या पात्रांद्वारे गवस यांनी लेखकाची भूमिका मांडत समाजातील भ्रष्टता समोर आणली आहे.
- २५) राजन गवस यांच्या 'धिंगाणा', 'कळप' आणि 'तणकट' या कादंब-यांमध्ये बदलते अर्थकारण, उद्योग, व्यापार, संस्कृतीमुळे आलेली बाजारमूल्ये, व्यापारी जगण्याची मूल्ये, उपभोगाची वृत्ती, देशीय संस्कृती, देशीय मूल्यांचा -हास या सा-यांचे विश्लेषण आलेले आहे.
- २६) गवस यांच्या 'धिंगाणा', 'कळप' आणि 'तणकट' या कादंब-यांमध्ये स्वातंत्र्योत्तर काळातील समाज जीवनातील विविध जातींचे राजकारण, त्यात आलेली अवकळा, विविध पातळ्यांवर होणारी गुंतागुंत प्रकट करण्यावर भर

दिलेला आहे.

- २७) राजन गवस यांच्या 'धिंगाणा', 'कळप' आणि 'तणकट' कादंब–यामधील नायक दु:खाचा पर्याय स्वीकारून नैतिकता जपण्याचा प्रयत्न करताना दिसतात.
- २८) समाज व्यवस्थेमध्ये होऊ लागलेले विघटन कुटुंबातूनही सुरू झालेले आहे. हे त्यांनी 'भंडारभोग', 'धिंगाणा', 'कळप' आणि 'तणकट' मध्ये दिसून येते.
- २९) 'कळप' मध्ये ग्रामीण साहित्य आणि महात्मा फुले यांचे अतुट संबंध सांगितले आहे.
- ३०) 'धिंगाणा', 'कळप' आणि 'तणकट' मध्ये महाराष्ट्रातील शैक्षणिक परिसर आलेला आहे. त्यातून शालेय, कॉलेजचे वातावरण चित्रित करत विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यामध्ये वाढत गेलेला विसंवाद, परीक्षेतील गोंधळ, शिकविण्यातील यांत्रिकपणा, शाळा कॉलेजमध्ये चालणा–या चळवळी, त्यातील फोलपणा ही चित्रित केलेला आहे.
- ३१) राजन गवस यांनी कथा कादंब–यांमध्ये बोलीभाषेचा सहज वापर करून त्या परिसरातील लोकमानस त्या बोलीभाषेतून मांडलेले आहे. बोलीभाषा, व्यक्तिभाषा यांचा सर्जनशील उपयोग हे त्यांच्या कादंबरीचे महत्त्वाचे अंग आहे. त्यांच्या कथा कादंब–यांतील पात्रे त्यांच्या भाषिक लकबीसह आलेली आहेत.

वरील सर्व विवेचनावरून लक्षात येते की, राजन गवस यांनी मराठी कादंबरीतील बाबा पद्मनजीं – ह.ना.आपटे – केतकर – साने गुरूजी – विभावरी शिरूरकर – भालचंद्र नेमाडे इ. च्या समाजसन्मुख वास्तववादी दृष्टिकोनाशी आपले नाते सांगत मराठी कादंबरीतील वास्तववादी प्रवाह अधिक सशक्त करण्याचा प्रयत्न केला आहे.

गवस यांच्या कादंब–यातील आशयसूत्रे देशी जाणिवेतून निर्माण झालेली असून त्यात नवनैतिकवादी दृष्टिकोन अंगिकारण्यात आलेला आहे. ही लेखनप्रवृत्ती वास्तवाशी आपले अतूट नाते सांगणारी आहे. त्यामुळे या कादंब–यातील पात्रे, प्रसंग, तंत्र, कथानक, निवेदन इ. सर्व तत्त्वांना आशयाचे भक्कम अंग प्राप्त होते. त्यांच्या कादंब–यातून देवदासी,

जोगते व त्यांच्या भोवतालचे चौंडके यांचे जीवनविषयक प्रश्न, ग्रामीण स्त्रियांच्या जगण्याची शोषित अवस्था, गाव व शहर यातील ताणतणाव व मूल्यविषयक विसंवाद, शिक्षण क्षेत्रातील भ्रष्टाचार, दलित नेतृत्त्व, दलित जातिविषयक प्रश्न व सवर्ण समाजाचा दृष्टिकोन यांच्या समाजाच्या अंत:स्तरावर घडणा-या विविध आंतरप्रक्रिया, सच्चेपणाने जगण्याची इच्छा करणा-या व्यक्तींची होणारी कोंडी इ. अनेकविध आशयसूत्रे त्यांच्या कादंब-यांतून येतात. या आशयसूत्रांची निवड, त्यातील घटना प्रसंगपात्रे व तपशील वास्तवातून घेतलेले असतात. या निवडीमागे त्यांची स्वत:ची अशी एक स्वतंत्र मूल्यदृष्टी कार्यरत असते व त्यामुळेच यातील तपशील आशयात्मक अंग धारण करतात. यातील आशयाचे निवेदन, भाषा हे व्यक्ती व समाजप्रवृत्ती यांच्या बाह्य व आंतरिकतेचे वास्तवरूप प्रभावीपणाने प्रकट करतात. रंजनवादी मूल्यांच्या जोखडातून बाजूला होत व्यक्ती समाज परस्परसंबंधाच्या समग्र आकलनाच्या प्रयत्नातून गवस यांनी मानवी जीवन दर्शनाच्या मराठी कादंबरीच्या कक्षा अधिक व्यापक करीत तिला समर्थपणे वास्तवाभिमुख केले, असे निर्विवादपणे म्हणता येते.

◆ ◆ ◆ ◆ ◆ ◆ ◆ ◆ ◆ ◆ ◆ ◆ ◆ ◆ ◆ ◆

# परिशिष्टे



| | | |
|---|---|---|
| परिशिष्ट १ | राजन गवस यांची मुलाखत | पृष्ठ क्र.३१८ ते ३२१ |
| परिशिष्ट २ | संदर्भग्रंथ सूची | पृष्ठ क्र.३२२ ते ३२४ |
| परिशिष्ट ३ | मासिके-त्रैमासिके-दिवाळी अंक सूची | पृष्ठ क्र.३२५ |
| परिशिष्ट ४ | वृत्तपत्रे सूची | पृष्ठ क्र.३२६ |
| परिशिष्ट ५ | कोश संदर्भ | पृष्ठ क्र.३२६ |

# परिशिष्ट १- राजन गवस यांची मुलाखत

प्र.१) 'हुंदका' हा काव्यसंग्रह, 'रिवणावायली मुंगी' हा  कथासंग्रह यानंतर कादंबरीकडे वळलात.कादंबरीप्रकाराकडे वळण्याचे कारण काय?

**गवस - कविता व कथेनंतर मी कादंबरीकडे वळलो हे खरे आहे. कविता हा संवेदनशील,टोकदार व अल्पाक्षरी असा अभिव्यक्त होण्याचा प्रकार आहे. त्याचे स्वतंत्र अस्तित्व आहे. कथा हा उपुयक्त वाङ्मय प्रकार असून यात आपल्याला काही आजमावता येते. मात्र, कादंबरी हा व्यापक पट असणारा वाङ्मयप्रकार असून यामधून काळाचा दीर्घ पट समग्रपणे उभा करता येतो. त्यामुळे मला सखोलपणे दीर्घ काही मांडावयाचे होते. तेव्हा कादंबरीशिवाय पर्याय नव्हता. आजही मी कथा,कादंबरी आणि कविता अशा तिन्ही प्रकारात लेखन करीत असतो.**

प्र.२) 'चौंडकं' या पहिल्या कादंबरीत सुलीचे सुंदर असणे आवश्यक आहे का? तुम्ही रोमँटिक दृष्टीकोनातून पाहिले असे मला वाटते. यावर तुमचे मत जाणून घ्यायचे आहे.

**गवस - कादंबरी लिहित असताना लेखकाला अमुक आवश्यक,तमुक अनावश्यक असे काही ठरवून लिहिता येत नाही.एकदा तुम्ही लिहिण्याच्या व्यूहात अडकलात की, तुमच्या हातात काहीच उरत नाही. कादंबरीतील तपशीलाची निवड फक्त तुमच्या हातात राहते. बाकी सर्व होऊन जाते, एवढेच म्हणता येईल. सुलीचे सुंदर असणे हे काही योजकतापूर्वक केलेले नसून ते कादंबरीच्या व्यूहात घडलेले आहे. आणि तिचे सुंदर असणे तुम्हास**

रोमँटिक वाटते हा मात्र मला विनोद वाटतो. सुंदर देवदासी असण्याला कोणाचा आक्षेप कसा काय असू शकतो?

प्र.३) सुली आणि बबन्या यातील तारूण्यसुलभ आकर्षण 'चौंडकं'मध्ये येते, 'भंडारभोग' मध्ये तायाप्पा आणि रत्नव्वा यांच्या संबंधात तुम्ही थोडे अधिक खोलात शिरला आहात, म्हणजे स्त्री पुरूषांच्या तारूण्यसुलभ आकर्षणापेक्षा थोडे जास्त खोलात. तरीही प्रेम भावनेचे चित्रण तुमच्या कादंब–यातून फारसे येत नाही. व्यक्तीच्या सामाजिकतेचे चित्रण करीत असताना त्याचा असा काही मनोभावही कृतीशीलतेवर अनेकवेळा बलवत्तर ठरत असतो, असे तुम्हास वाटत नाही का? या दृष्टीने तुमच्या कादंब–या जीवनाचा एक महत्त्वाचा भाग चित्रित होण्याचा राहून गेला आहे, असे तुम्हाला वाटते का?

**गवस – कथानकात गरजेच्या गोष्टी आपोआपच त्या संरचनेची गरज म्हणून येत असतात. एकदा तुम्ही लिहायला बसलात की अमुक आले नाही,म्हणून ते ठरवून या लेखनात आणूया असे करता येत नाही. प्रेमभावनेचे चित्रण जर त्या रूपबंधाची गरज असती तर तेथे प्रेमभावनेचे चित्रण आलेही असते. ती त्या रूपबंधाची गरजच नसेल तर तेथे प्रेमभावनेचे चित्रण येणार कसे? अमुक एक महत्त्वाचा भाग कादंबरीत चित्रित होणे राहून गेले, असे मला मात्र वाटत नाही.**

प्र.४) 'चौंडकं' आणि 'भंडारभोग' या कादंबरीमध्ये देवदासी प्रथेचे बळी होण्यास कारण स्त्रियाच झाल्या आहेत. या स्त्रिया कौटुंबिक आपत्ती दूर करण्यासाठीच आपल्या मुलांना या अंधकारमय वाटेवर पाठविण्यास कारणीभूत झालेल्या दिसतात. याला कारण काय? या परंपरेचा बळी फक्त स्त्रियांद्वारेच घेतला जातो. असे तुम्हाला सुचवायचे आहे का?

**गवस – या परंपरेत जे बळी गेले जे बळी घेतले जातात, ते व्यवस्थेकडून घेतले जातात. येथे स्त्री अथवा पुरूष हे कारण नसतात. तर धर्म नावाची सत्ता, त्या सत्तेचे ठेकेदार असे बळी घेत असतात. स्त्री अथवा पुरूष यांची अगतिकता, असाहाय्यता याला कारण ठरत असते. या सर्व प्रश्नांच्या मुळाशी आर्थिक प्रश्नही असतातच.**

प्र.५) 'धिंगाणा','कळप' ,'तणकट'या कादंबरीतील नायक/मुख्य पात्रे एक वैचारिक निरीक्षक म्हणूनच वावरताना दिसतात. कुठेही त्या विचारांप्रमाणे वागताना दिसत नाही. ही पात्रे क्रियाशील नसण्याचे कारण काय? फक्त प्रतिक्रिया नोंदवून स्वत: काय करायचे हे नक्की करू शकत का नाहीत? तेथे ,'कळप' मध्ये शंक-या हा काहीवेळा कृतिशील झालेला दिसतो. 'तणकट'मध्ये कबीरची कृती वैचारिकतेनुसार किंवा चार-दोन घरांपुरती मर्यादित आहे. तर ' धिंगाणा' मध्ये चेअरमन वैचारिकदृष्ट्या कृतीशील दिसून येतो.

**गवस – कादंबरीतील नायक निरीक्षक म्हणून वावरताना आपणास दिसतात. पण ते काही कृती करत नाहीत. समोरच्या वास्तवात काहीच न करणे ही सुध्दा एक कृती असू शकते. कृतिशील नायक दाखवणे,प्रचार करणे असे काही माझ्या कादंबरीचे हेतू नाहीत. त्या त्या प्राप्त व्यूहात जो नायक आकारत गेला तोच चित्रित झाला आहे. बाकी तुमचे मत तुमच्या विचारातून, चिंतनातून! त्याबद्दल माझा आक्षेप नाही.**

प्र.६) 'कळप' ,'तणकट' मधील रघू,बल्लाळ यांच्या संवादातून आपण आपले मत मांडले आहे. असे मला वाटते.तुम्ही वाचकांना आपली मते सांगण्यासाठी या पात्रांचा उपयोग केला, असे म्हणू शकतो का?

**गवस – अभ्यासक काहीही म्हणून शकतो. त्याला माझा आक्षेप असण्याचे कारण नाही. पण, लेखक आपली मते पात्रांच्या तोंडून कशासाठी व्यक्त करील? त्याला संपूर्ण कादंबरीच आपले मत प्रकट करण्यासाठी उपलब्ध असते. एखाद्या पात्राला असे राबवण्यापेक्षा तो संपूर्ण संरचनाच भारीत करीत असतो.**

प्र.७) 'चौंडकं' ते 'तणकट' कादंबरी लेखनाच्या प्रवासात कादंबरी या वाङ्मय प्रकाराविषयी आपल्या काही संकल्पना बदलल्या गेल्या आहेत का?

**गवस – कादंबरी वाङ्मय प्रकाराची संकल्पना कादंबरीच बदलत असते, हे रंगनाथ पठारे यांचे मत मला अधिक महत्त्वाचे वाटते. लेखनप्रवासात लेखकाच्या संकल्पना अधिक विकसित होत असतात, एवढे मात्र निश्चित.**

प्र.८) नेमाडे म्हणतात,'सामाजिक मूल्यांच्या पलीकडची उच्चतर स्थिती लेखकाला अभिप्रेत असावी लागते.' 'तणकट' मध्ये कबीरद्वारा ती व्यक्त झालेली जाणवते. परंतु बाकीच्या कादंब-यांमध्ये मला ती जाणवली नाही. ही मर्यादा असू शकते. तेव्हा या बाबतीत तुम्ही मला सांगू शकाल का?

**गवस – तुम्हाला काही जाणवणे अथवा न जाणवणे हा अभ्यासक म्हणून तुमचा अधिकार आहे. त्या वर मी अतिक्रमण कसे करू? एवढेच म्हणेन की, 'भंडारभोग' माझी आवडती कादंबरी आहे.**

-- राजन गवस

# परिशिष्ट २- संदर्भ ग्रंथ सूची


१) कुलकर्णी अनिरूध्द(संपादक)-प्रदक्षिणा- मराठी कादंबरी=कॉन्टिनेन्टल प्रकाशन,पुणे -सातवी आवृत्ती,१९८०

२) कुलकर्णी मदन-देवदासी:यल्लम्माच्या जोगतिणी-विजय प्रकाशन,नागपूर- पहिली आवृत्ती ,१९९४

३) खोले विलास (संपादक)-गेल्या अर्धशतकातील मराठी कादंबरी- लोकवाङ्मय गृह,मुंबई-पहिली आवृत्ती,२००२

४) जोशी सुधा - कथा:संकल्पना आणि समीक्षा - मौज प्रकाशन, मुंबई – पहिली आवृत्ती, २००४

५) टापरे पंडित - कथा रूप आणि आस्वाद – नीहारा प्रकाशन, पुणे – पहिली आवृत्ती, १९९९

६) टापरे पंडित-कादंबरीसंवाद-पद्मगंधा प्रकाशन,पुणे -पहिली आवृत्ती,२००५

७) देवधर विद्या -स्त्री साहित्याचा मागोवा-खंड १ (इ.स. १८५० ते १९५०)- साहित्यप्रेमी भगिनी मंडळ,पुणे-पहिली आवृत्ती,२००२

८) देशपांडे कुसुमावती - मराठी कादंबरीचे पहिले शतक- प्रकाशन,मुंबई मराठी साहित्यसंघ-दुसरी आवृत्ती,१९७५

९) नंदपुरे ईश्वर(संपादक) -साहित्य:ग्रामीण आणि दलित- विजय प्रकाशन,नागपुर- पहिली आवृत्ती,२००२

१०) नेमाडे भालचंद्र - टीकास्वयंवर-साकेत प्रकाशन, औरंगाबाद - पहिली आवृत्ती,१९९०

११) पठारे रंगनाथ – सत्त्वाची भाषा– मुलाखत– शब्दालय प्रकाशन,श्रीरामपूर–पहिली आवृत्ती,१९९७

१२) पाटणकर रा.भा.- सौंदर्यमीमांसा–कॉंटिनेंटल प्रकाशन,,पुणे– दुसरी आवृत्ती,१९८१

१३) बापट आणि गोडबोले – मराठी कादंबरी (तंत्र आणि विकास)– व्हीनस प्रकाशन, पुणे – तिसरी आवृत्ती ,१९७३

१४) बांदिवडेकर चंद्रकांत –मराठी कादंबरीचा इतिहास(१९२०-१९४७)–मेहता पब्लिशिंग हाऊस,पुणे –दुसरी आवृत्ती,१९९६

१५) भांड बाबा –कोसलाबद्दल– प्रस्तावना – साकेत प्रकाशन, औरंगाबाद – दुसरी आवृत्ती,१९९६

१६) मुलाटे वासुदेव– ग्रामीण कथा: स्वरूप आणि विकास – स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद – दुसरी आवृत्ती, २००५

१७) मुलाटे वासुदेव–ग्रामीण साहित्य:चिंतन आणि चर्चा–स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद –पहिली आवृत्ती,२००५

१८) रायकर सीताराम (संपादक)–वाङ्मयीन वाद : संकल्पना व स्वरूप – मेहता पब्लिशिंग हाऊस,पुणे – पहिली आवृत्ती, १९९७

१९) सरदार गंगाधर बाळकृष्ण –गांधी आणि आंबेडकर– सुगावा प्रकाशन ,पुणे– पुनर्मुद्रण २०जुलै२००४

२०) सानप किशोर – प्रायोगिक कादंबरी आणि श्याम मनोहर – बजाज पब्लिकेशन्स्, अमरावती – पहिली आवृत्ती , १९९८

२१) सानप किशोर –भालचंद्र नेमाडे यांची कादंबरी: एक चिकित्सा– साकेत प्रकाशन, औरंगाबाद – पहिली आवृत्ती ,१९९६

२२) सानप किशोर –मराठी कादंबरीतील नैतिकता–बजाज पब्लिकेशन्स, अमरावती – पहिली आवृत्ती ,१९९८

२३)	हस्तक उषा – कादंबरी आणि मराठी कादंबरी – साहित्यसेवा प्रकाशन, औरंगाबाद – पहिली आवृत्ती ,१९९३

------

# परिशिष्ट ३- मासिके-त्रैमासिके आणि दिवाळी अंक सूची

१) अनुष्टुभ – जुलै, ऑगस्ट - १९९८

२) अनुष्टुभ - जाने , फेब्रु – २००५

३) आलोचना– फेब्रुवारी १९७१

४) नवभारत- सप्टेंबर २०००

५) नवभारत-नोव्हेंबर,डिसेंबर-२००१

६) नवशक्ती – ऑगस्ट २०००

७) महाराष्ट्र साहित्य पत्रिका-जानेवारी, मार्च-१९५२

८) महाराष्ट्र साहित्य पत्रिका-एप्रिल-मे-जून-१९५५

९) महाराष्ट्र साहित्य पत्रिका-एप्रिल-मे-जून-१९६३

१०) मेहता मराठी ग्रंथ जगत-फेब्रुवारी १९९९

११) युगवाणी (दिवाळी अंक) १९८१

१२) ललित- ऑगस्ट १९८७

१३) ललित-दिवाळी अंक २०००

१४) ललित-फेब्रवारी,२००२

१५) वसंत- जून- १९९६

१६) विशाखा-सप्टेंबर-१९८७

१७) सत्याग्रही विचारधारा - जाने- १९९९

१८) सत्याग्रही विचारधारा-ऑगस्ट १९९९

## परिशिष्ट ४- वृत्तपत्रे सूची

१) केसरी - २६ जून १९८८

२) महाराष्ट्र टाईम्स-२१ मे १९८९

३) मुंबई तरुणभारत- २ जानेवारी-२००२

४) मुंबई तरुणभारत- १०फेब्रुवारी २००२

५) लोकसत्ता – २२ सप्टेंबर २००२

६) सकाळ – २२ सप्टेंबर २००२

७) सामना – ०६ जानेवारी २००२

## परिशिष्ट ५-कोश

१) संपादक-वाङ्मयीन संज्ञा संकल्पना कोश - जी.आर.भटकळ फाउण्डेशन,मुंबई - पहिली आवृत्ती,२००१- पृ.४२

◆◆◆◆◆◆◆◆◆